# महासचिवांचा अहवाल

**<u>1 एप्रिल 2021 ते 31 मार्च 2022</u>**

प्रिय रसिकवाचक मित्रहो, सन 2021-22 या वर्षाचा संस्थेचा महासचिवांचा अहवाल सादर करताना माझ्या मनात संमिश्र सुखदू:खाचे भाव विलोल हिंडोळत आहे. कारण गतवर्ष हे अत्यंत कारुण्य पूर्ण भावभावनांचे होते. त्या तुलनेत हे वर्ष सरळ आणि सर्वांना सर्वसाधारण आरोगयपूर्ण राहील असे वाटते. कारण नैसर्गिक संकेतही तसेच प्रतीत होत आहेत. त्यामुळे यावर्षीचा वसंत आम्रफलांच्या आस्वादणे अपेक्षितपने अमृततुल्य असा स्वाद देऊन जाईल. त्यामुळे येत्या वर्षाची अपेक्षा आणि फलश्रुति काहीशी गतवर्षी पेक्षा आनंदमय ठरावी ही सदिच्छा व्यक्त करताना गतवर्षी आपल्या अपेक्षेपेक्षा आपली सेवा कमी किंवा अल्प प्रमाणात झाली असेल तर खेद व्यक्त करून आपल्या सेवेत अहर्निश सादर होण्याचा मी सविनय प्रयत्न करेल. सन 2021- 22 या वर्षभरात संस्थे द्वारा कोविडचे भयावह वातावरण असतानाही संस्थेने वर्षभरात 11 उपक्रम यशस्वीपणे राबविले याचा मला विशेष आनंद वाटतो.

1. **<u>शिष्यवृत्ती वितरण सोहळा :</u>** संस्थे द्वारा दरवर्षी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती देण्यात येते. मात्र मागील वर्ष हे कोविड जन्य असल्याने वर्षभर शाळा, महाविद्यालये ही पूर्णतः बंदच होती. विद्यार्थी अभ्यास घरूनच करत होते. तरीदेखील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन 3 एप्रिल 2021 रोजी संस्थेच्या कार्यालयात नाशिक जिल्ह्यातील दृष्टिहीन विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे धनादेश प्रदान करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ नाशिक ऐरपोर्टचे अध्यक्ष हेमल ओझा, गौरंग ओझा व अनंत ठाकरे उपस्थित होते. या उपक्रमाचा 75 विद्यार्थ्यांना लाभ झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता संस्थेच्या मानद अध्यक्षा कल्पना पांडे, विजया मराठे यांनी परिश्रम घेतले.







2. **<u>कोविड काळात रेशन वाटप :</u>** एप्रिल व मे 2021 या कालावधीत पुनः एकदा आपल्या देशात व राज्यात कोविड ची दुसरी लाट आली व या लाटेने अक्षरशः कहर केला. व राज्यात पुनः कडक निर्बंध लादण्यात आले. पर्यायाने पहिल्या लाटे प्रमाणेच हातावर असलेले व्यवसाय नष्ट झाले त्याला मग अंध व्यक्ति कशी अपवाद असणार? कारण अनेक दृष्टिहीन बांधव रेल्वे, बस स्टँड अशा ठिकाणी छोट्या मोठया वस्तूंची विक्री करून आपला उदरनिर्वाह चालवतात. परंतु निर्बंध जन्य स्थितीत त्यांना शक्य नव्हते. म्हणूनच त्यांच्या कुटुंबाची उपासमार होऊ नये म्हणून “संस्था आली आपल्या दारी” ही मागच्या वर्षाचीच संकल्पना राबवून दि.1 व 2 जून 2021 रोजी किमान महिनाभर पुरेल एवढा किरणा 120 दृष्टिहीन व्यक्तींना घरपोच देण्यात आला. ज्यामध्ये गहू, तांदळापासून ते कोलगेट व साबण पर्यंत अशा जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता. त्याकरिता प्रातिनिधिक स्वरूपात 5 अंध व्यक्तींना पी.आय विजय धमाळ, के के वाघ महाविद्यालयाचे प्राचार्य नांदुर्डीकर सर व राजू व्यास यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आला. त्यानंतर सर्व

व्यक्तींना घरपोच रेशन दिले. यावेळी विजय धमाल यांनी संस्था राबावत असलेल्या उपक्रमांची प्रशंसा केली व योग्य वेळी संस्थेने हा उपक्रम राबविल्या बद्दल समाधान व्यक्त केले. श्री. नांदुर्डीकर यांनी देखील स्तुत्य उपक्रमांकारिता समाज नेहमीच सकारात्मक राहतो व आम्ही देखील आपणास सर्वोतोपरि सहकार्य करू असे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर, राजू व्यास, डॉ. विश्वासराव गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.




3. **<u>आषाढी एकादशी निमित्त भक्ति संगीत मैफिल उत्साहात संपन्न</u>** : खरेतर अंध व्यक्तींच्या कलागुनांना वाव मिळावा व समाजाला देखील त्यांच्या क्षमता समजाव्या या हेतूने दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने "पंढरीचे सुख नाही त्रिभुवणी" या मैफिलीचे आयोजन नाट्य गृहात करण्यात येते. जेणेकरून रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. परंतु याही वर्षी कोविड जन्य वातावरण होते. परंतु कार्यक्रमात खंडही पडता काम नये म्हणून 20 जुलै 2021 रोजी संस्थेच्या कार्यालयात ऑनलाइन पद्धतीने "पंढरीचे सुख नाही त्रिभुवणी" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ख्यातनाम पार्श्वगायक शंकर महादेवन व अभिनेत्री वर्षा उसगावकर हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. आरंभी सर्व कलाकारांनी राम कृष्ण हरी चा गजर केला. त्यानंतर श्री. सखाराम बनकर यांनी इंद्रायणी काठी, संत भार पंढरीत, तुज सगुण म्हणू की निर्गुण रे अशी एका पेक्षा एक अभंग सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. तर अर्जुन शिंदे या अंध कलावंताने देखील विठु दिनाचा दयाळू, घेइ घेई माझे वाचे गोड नाम विठोबाचे, असे अभंग सादर करून रसिकांची वाह वाह मिळवली. तर दिपाली गांगुर्डे हिने गायलेल्या कानाडा राजा पंढरीचा ह्या गीताला once more मिळाले. तर शंकर महादेवन यांनी सर्व कलाकारांचे भरभरून कौतुक केले. व संस्थेच्या भावी उपक्रमांना भरभरून सुभेच्छा दिल्या. त्यांनी देखील या कार्यक्रमात माझे माहेर पांढरी हा अभंग गाऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली. तर वर्षा उसगावकर यांनी देखील विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोवला ही गीत गाऊन उपस्थितांना आषाढीच्या सुभेच्छा दिल्या. व भविष्यतही असेच उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा व्यक्त कली. या कार्यक्रमात लायन्स क्लब कॉर्पोरेटचे अध्यक्ष विनय बिरारी व त्यांचे सहकारी उपस्थित होते. आरंभी त्यांनी सर्व कलाकारांचा सत्कार केला व संस्थेच्या चांगल्या उपक्रमांना लायन्स क्लब कॉर्पोरेट सदैव आपल्या पाठीशी राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीत महासचिव दत्ता पाटील, संचालक भगवान पवार, व राजू व्यास यांनी विशेष परिश्रम घेतले.







**4.** **<u>माहिती व संगणक तंत्रज्ञान पुस्तकाचे समाज कल्याण मंत्री श्री. धनंजय मुंडे यांच्या हस्ते प्रकाशन :</u>** अंध व्यक्तींना ब्रेल वाचण्याची आवड असतानाही त्यांची वाचनाची भूक साहित्य उपलब्ध नसल्याने पूर्ण होत नाही म्हणून संस्थेने विनंती केल्यानुसार कोटक महिंद्रा बँकेच्या सी. एस.आर उपक्रमा अंतर्गत संगणक व माहीती तंत्रज्ञान व संगीत दृष्टी साधना या पुस्तकांची निर्मिती करण्यात आली. जेणेकरून ही दोन्ही पुस्तके ब्रेल लिपीत छापण्यात आले असून ही पुस्तक समाजापर्यंत पोहचावे म्हणून पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याण मंत्री मा. श्री. धनंजय मुंडे यांच्या हस्ते कोविडचे नियम लक्षात घेऊन मोजक्या व्यक्तींच्या समवेत सह्याद्री गेस्ट हाऊस येथे 5 ऑगस्ट 2021 रोजी करण्यात आला. ह्या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन करते वेळी श्री. मुंडे यांनी आपल्या हातून हे पुस्तक प्रकाशित झाल्याचे समाधान व्यक्त केले. व या दोन्ही पुस्तकातील आशय पाहता अंध व्यक्ति करीता ब्रेल लिपीत छापण्यात आलेली ही दोन्ही पुस्तके ज्ञानाचे नवे दालन होईल व त्याचा फायदा महाराष्ट्रातील असंख्य व्यक्ति व विद्यार्थ्यांना होईल अशी अपेक्षा व्यक्त केली व शासनाच्या माध्यमातून आणखी काही साहित्य ब्रेल लिपीत प्रकाशित करू असे आश्वासन दिले. यावेळी कोटक बँकेच्या वतीने राधा कोईपपुरम ऑनलाइन उपस्थित होत्या. आरंभी संस्थेच्या उपक्रमांची माहिती पावर पॉइंट च्या द्वारे उपाध्यक्ष विश्वासराव गायकवाड यांनी करून दिली. यावेळी लायन अर्चना शहा, मानद अध्यक्षा कल्पना पांडे, अध्यक्ष अरुण भारस्कर व अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संचालक अर्जुन मुद्दा व संस्थेच्या खजिनदार विजया डबे यांनी परिश्रम घेतले.





**5.** **<u>शालेय साहित्य वितरण :</u>** २०२१ हे वर्ष कोविडजन्य असल्यामुळे शाळा ह्या ऑनलाइन पद्धतीने सुरू होत्या. परंतु अनेक संस्थेचे लाभार्थी हे गरजू असल्याने त्यांच्या पाल्यांना संस्थेद्वारा शैक्षणिक मदत व्हावी या उद्देशाने दि. ८ ऑगस्ट २०२१ रोजी संस्थेच्या कार्यालयात ४५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण यूनियन बँकेचे असिस्टंट झोनल मॅनेजर संजय लाकरा व कर्नल स्वामी यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. ज्यामध्ये रजिस्टर, कंपास व अन्य शैक्षणिक साहित्य देण्यात आले. तर यावेळी कर्नल स्वामी यांनी उपस्थित दृष्टिहीन व्यक्तींना युद्धजन्य

परिस्थितील काही प्रसंग विषद केले तर खडतर प्रवासतही आपला मार्ग सुखर कसा करता येतो. याबद्दल जागरूकता निर्माण केली. आपण दृष्टिहीन असलात तरीही आपण स्वत:ला कमी समजू नये. हिम्मत न हारता मार्गक्रमण करावे. तर श्री. लाकरा यांनी देखील संस्थेच्या उपक्रमाची प्रशंसा केली. व मला जवळून संस्थेचे कार्य बघण्याची संधी आयोजकांनी उपलब्ध करून दिल्या बद्दल समाधान व्यक्त केले. व असाच कार्यक्रम 11 सप्टेंबर 2021 रोजी संस्थेद्वारा अंबरनाथ येथे देखील करण्यात आला. वांगणी, बदलापूर, व अंबरनाथ परिसरातील ७२ व्यक्तींनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. या कार्यक्रमास रोटरी क्लब चे अध्यक्ष निखिल चौधरी व विठ्ठल वाडी रॉटरी चे निलेश वाजराणी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अध्यक्ष अरुण भारस्कर महासचिव दत्ता पाटील व रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.





**<u>6. पांढरी काठी दिन उत्साहात संपन्न :</u>** 15 ऑक्टोबर हा दिवस यूनो ने घोषित केल्यानुसार संबंध जगभर जागतिक पांढरी काठी दिन म्हणून साजरी करण्यात येतो. या दिवशी दृष्टिहीन व्यक्ति वापरत असलेल्या काठ्यांची अनेक सेवाभावी संस्था प्रात्यक्षिकां द्वारे जागृती करण्यात येते. मग याला आपली संस्था कशी अपवाद राहणार. म्हणूनच 15 ऑक्टोबर 2021 रोजी संस्थेच्या वतीने प्रथम राजीव गांधी सिग्नल येथे प्रात्यक्षिके करून दाखविले जेणेकरून ज्याच्या हातात पांढरी काठी आहे अशी व्यक्ति अंध आहे हे समाजाने गृहीत धरावे व समाजाने अशा व्यक्तींना रस्ता ओलांडण्याकरिता मदत करण्याबाबतचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. व त्यानंतर पंडित कॉलनी लायन्स क्लब हॉल येथे मिरवणुकीचे कार्यक्रमात रूपांतर झाले. या कार्यक्रमाला लायन्स क्लब चे अध्यक्ष सतीश आलय, प्रवीण जयकृष्ण रे, व लायन्स क्लब कॉर्पोरेट चे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंधांच्या क्षमता काय आहेत हे समाजाला कळावे. या उद्देशाने आरंभी अंधाराकडून प्रकाशाकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्या द्वारे अंध व डोळस बुद्धिबळ हा खेळ कसा खेळू शकतात. पैसे ओळखणे व इशाऱ्याने वस्तु ओळखणे आदि. उपस्थित अंध 109 व्यक्तिंना पांढऱ्या काठीचे वाटप करण्यात आले. तर लंका क्षीरसागर, सुनीता बोरडे, राजू गिते, सुरेन्द्र महालकर, या दृष्टिहीन व्यक्तींना स्वयंरोजगारांसाठी मदत करण्यात आली. यावेळी जयकृष्ण रे यांनी संस्थेच्या उपक्रमांची प्रशंसा केली व चांगल्या उपक्रमांसाठी लायन्स क्लब ऑफ नाशिक रॉयल्स हा सदैव आपल्या पाठीशी राहील अशी ग्वाही दिली. तर यावेळेस मंचावर लायन्स कॉर्पोरेट चे अध्यक्ष श्री विनय बिरारी उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून दिवाळी मिलन कार्यक्रमासाठी भरीव सहकार्य करू अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता, अध्यक्ष अरुण भारस्कर, मानद अध्यक्षा कल्पना पांडे, राजू व्यास यांनी विशेष परिश्रम घेतले.







**7. दिवाळी मिलन कार्यक्रम उत्साहात संपन्न :** सालाबादाप्रमाणे याही वर्षी धनत्रयोदशी चे औचित्य साधून मंगळवार दिनांक 30 नोव्हेंबर 2021 रोजी औरंगाबाद रोड येथील स्वामीनारायण मंदिर याच्या बँक्वेट हॉल मध्ये दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खरे तर दिवाळी सण म्हटला की तो सर्वांच्या घरी मोठ्या उत्साहात संपन्न होत असतो आणि म्हणूनच असं म्हटलं जातं "दिवाळी सण मोठा, नसे आनंदास तोटा". परंतु आमच्या दृष्टीनं बांधवांच्या घरी देखील दिवाळी सण साजरा व्हावा. या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर नाशिक मनपा स्थायी समिती अध्यक्ष गणेश भाऊ गीते प्रकाश काकड, उद्योजक नंदू अहिरे, उद्योजक लायन्स क्लब कॉर्पोरेट चे अध्यक्ष विनय बिरारी हे उपस्थित होते. यावेळी आरंभी अंध बांधवांना एक नवी ऊर्जा मिळावी व दिवाळी सणाचे वातावरण निर्माण व्हावं म्हणून मनोरंजनकर्ता ऑर्केस्ट्रा "स्वरांगण" आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे दिवाळीचे वातावरण अतिशय प्रसन्न वाटत होते आणि याच कार्यक्रमात 132 अंध व्यक्तींना महिनाभर पुरेल एवढं किराणा साहित्य संस्थेचे संचालक अर्जून मुद्दा यांनी पाठवलेले पुरुषांकरिता ड्रेस व शरद शाहा व काकड यांच्यावतीने साड्यांचे वितरण करण्यात आले होते. तर मोमीन सय्यद व विजय गोसावी यांना व्यवसायाकरिता प्रत्तेकी एक असे टपऱ्यांचे वाटप करण्यात आले. श्री गोसावी व मोमीन सय्यद यांचा रोजगाराचा प्रश्न कायम सुटेल असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी व्यक्त केला. तर श्री गणेश भाऊ गिते यांनी देखील संस्था अतिशय चांगलं काम करते आहे. मागील दहा वर्षांपासून या संस्थेचे कार्य मला ज्ञात आहे असंच काम संस्थेने यापुढेही करत राहावं मी आपणास सदैव सहकार्य करेल. तर लायन्स क्लब अध्यक्ष श्री विनय बिरारी यांनी देखील संस्थेला आपण सदैव मदत करू कारण या रोजी टपरी मुळे खऱ्या अर्थाने अंधांना रोजगार प्राप्त होईल व त्यांचा दिवाळीचा सण देखील अगदी उत्तम पद्धतीने साजरा होईल. श्री. प्रवीण भाई पारेख देखील या कार्यक्रमाला आले होते संस्थेच्या कार्याने ते भारावून गेले व यापुढे आपण संस्थेसाठी सदैव मदत करत राहू याची ग्वाही दिली. श्री. नंदू अहिरे यांनी आपल्या मनोगतातून सर्व अंध बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि लोकांच्या क्षमता काय असतात याची मला पुरेपूर कल्पना आहे. समाजाने त्यांना संधी द्यावी अशा अपेक्षा व्यक्त केल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रमुख अध्यक्ष अरुण भारस्कर कोषाध्यक्ष विजया मराठे मानद अध्यक्ष कल्पना पांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.






**<u>8. त्र्यंबकेश्वर येथे ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन:</u>** अंध व्यक्तींना अवांतर वाचन करता यावे किंबहुना अध्यात्माची गोडी लागावी व इतरांप्रमाणे आपणसाही ज्ञानेश्वरी सारख्या ग्रंथाची माहिती मिळावी शिवाय ज्ञानेश्वरी हा ग्रंथ प्राकृतिक भाषेत असल्याने ती भाषा जर समजली तर इतरही ग्रंथांचा अभ्यास करणे दृष्टिहीन व्यक्तींना शक्य होईल. या उद्देशानेच संस्थेच्या वतीने प्रथमच श्री रघुनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाने दिनांक 11 व 12 डिसेंबर 2021 रोजी त्र्यंबकेश्वर येथील जनार्दन मठात दोन दिवसीय ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. खरे तर हे ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रचंड मोठा असल्याने किमान 8 दिवस तरी पारायनाचे आयोजन करायला पाहिजे होते. 12 वा अध्याय भक्ति मार्ग व 18 मोक्ष संन्यास योग या दोन अध्यायांचे वाचन करण्यात आले.

अंध व्यक्ति देखील ब्रेल लिपीच्या माध्यमातून हे समाजाला समजावे कार्यक्रमाची समाजात जागृती व्हावी याकरिता 10 डिसेंबर 2021 रोजी आळंदी संस्थान चे अध्यक्ष ह. भ. प संदीपान महाराज यांचे सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. त्र्यंबकेश्वर आणि बाजूच्या पंच कृषितील हजाराहून अधिक लोक या कीर्तनास उपस्थित होते. व त्या सर्वांच्या साक्षीने हरिपाठ व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन सांदीपान महाराज हसेगावकर, शिक्षण अधिकारी श्री. मच्छिंद्र कदम व कार्यक्रमाचे कर्ता करविते श्री.श्री १००८ महंत महामंडलेश्वर श्री ह भ प रघुनाथ दासजी महाराज ( देवबाप्पा) उपस्थित होते. यावेळी श्री. कदम यांनी आपल्या मनोगतातून संस्थेने खऱ्या अर्थाने हा आगळा वेगळा उपक्रम राबवला आहे. ही सुरुवात आहे परंतु चांगल्या कामाची नांदी म्हणता येईल असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. असे स्तुत्य उपक्रम संस्थेने राबवावेत त्याकरिता वैयक्तिक मी केव्हाही सहकार्य करेल अशी ग्वाही दिली. श्री. सांदीपान महाराज यांनी देखील चांगल्या उपक्रमास उपस्थित राहण्याचा योग आला हा संत निवृत्ती नाथांचा प्रसादच म्हणावा लागेल कारण अनेक परायणे आज पर्यन्त मी बघितले परंतु दृष्टिहीन व्यक्तिनि केलेले हे पारायण पहिलेच असावे व या उपक्रमाची नोंद सुवर्ण अक्षरांत लिहिण्यासारखी आहे. व माऊलींनी एका अभंगात म्हंटल्या प्रमाणे दृष्टीहीनांकरिता खऱ्या अर्थाने आजचा दिवस म्हणजे **"आजी सोनियाचा दिनू वर्षे अमृताचा धणू"** हा उपक्रम सातत्याने राबवावा अशी त्यानी अपेक्षा केली व काही ओव्या दृष्टिहीन बांधवांसोबत वाचून त्यांनी पारयाणाचे उद्घाटन केले. तर श्री रघुनाथ महाराज ( देवबापा) यांनी हा उपक्रम त्र्यंबकेश्वर मध्ये होत असल्याचे समाधान व्यक्त केले. व चांगल्या उपक्रमांना आमची संस्था नेहमीच सहकार्य करते. यापुढेही संस्थेने नियमतपणे उपक्रम राबवावेत, व शक्य असेल ते सहकार्य भविष्यातही करू अशी ग्वाही दिली व महाराष्ट्रातून आलेल्या सर्व दृष्टिहीन बांधवांना या पारायनातून चांगल्या गोष्टी आत्मसात कराव्या आणि दैनंदिन जीवनात देखील त्याचे आचरण करावे असा संदेश दिला. या उपक्रमा करिता संबंध राज्यातून एस टी चा संप असतानाही 72 महिला व पुरुषांनी सहभाग नोंदविला. व या उपक्रमाची दखलही सर्व प्रसारमाध्यमांनी घेतली. या सर्व भाविकांची निवास, भोजनाची व प्रत्तेकास ज्ञानेश्वरी भेट देण्यासाठी रघुनाथ महाराज यांनी विशेष योगदान दिले. किंबहुणा त्यांच्या सहकार्यानेच हे पारायण यशस्वी म्हंटल्यास वावगे नाही.

कार्यक्रमाच्या समरोपाकरीता नाशिकचे महसूल आयुक्त राधाकृष्ण गमे, त्र्यंबकेश्वर चे तहसीलदार श्री. गिरासे, त्र्यंबक नगराध्यक्ष पांडुरंग सोनवणे व चाटे क्लास चे संचालक श्री. मॅचिंद्र चाटे उपस्थित होते. श्री. गमे यांनी बोटाच्या स्पर्शाने अंध व्यक्ति वाचन करतात हे मला ज्ञात होते परंतु प्राकृतिक भाषेतील ज्ञानेश्वरी देखील ते सहजरीत्या वाचतात हे बघितल्या वर मला विशेष आनंद वाटला. व शासना मार्फत आपल्या काही अडचणी असल्यास त्या सोडविण्या करिता जरूर पाठ पुरवठा करू असे आश्वासित केले. व हे पारायण दोन दिवस अखंड पणे चालू ठेवण्या करिता श्री. पुंडलिक पिंपळके यांनी विशेष परिश्रम घेतेले ते अंध असतानाही ग्रंथाचे पुढे वाचन करायचे व त्याचा भावार्थही उपस्थितांना समजून सांगत होते. म्हणून देवबाप्पा यांनी त्यांचे कौतुक केले व श्री हिरामन टिळे ही अंध असताना देखील सामाजिक कर्तव्य म्हणून व वडिलांच्या स्मरणार्थ हरीपाठाचे पुस्तक त्यांनी सर्व दृष्टीहीन बांधवांना भेट म्हणून दिले. हा देखील एक चांगला संदेश पोहचण्यास मदत झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अध्यक्ष अरुण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील, श्री महेंद्र मोरे, श्री. हिरामण टिळे, पुंडलिक पिंपळके व रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.







**<u>9. लुईस ब्रेल पुण्यतिथि उत्साहात संपन्न:</u>** अंधांचे दैवत ज्यांना समजण्यात येते किंबहूना आज अंध व्यक्ति डोळस व्यक्तींच्या खांद्याला खांदा लाऊन समाजात उभे आहेत व आपणही या देशाचा एक अविभाज्य घटक असल्याचे वेळोवेळी सिद्ध केले आहे. हे केवळ अंधांचे दैवत स्वर्गीय लुईस ब्रेल यांच्या मुळेच आणि म्हणून त्यांची पुण्यतिथि दरवर्षी अंध क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्था 6 जानेवारी या त्यांच्या पुण्यतिथि दिनी आदरांजली देत असतात म्हणूनच मग त्याला आपली संस्था कशी अपवाद असणार. आज प्रांजल पाटील सारख्या अंध महिला कलेक्टर सारख्या पदावर काम करत आहेत तर बालाजी मंजुळे सारखी अंध व्यक्ति संधि मिळाली म्हणून महाराष्ट्र राज्याचे अपंग आयुक्त असल्याचे आपणास ही माहीतच असेल ज्यांना संधि मिळाली त्यांनी ह्या संधीचे खऱ्या अर्थाने सोनेच केले आहे हे वरील उदाहरणांवरून लक्षात येते. मात्र इतरही दृष्टिहीन बांधवांनी अशा व्यक्तींचा आदर्श घ्यावा त्याकरिता त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज असते. या निमित्ताने अंध व्यक्तीच्या सुप्त गुणांना वाव मिळण्याकरिता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. मात्र यावर्षी कोविड जन्य परिस्थिति असल्याने व कार्यक्रम घेऊ नये असे शासनाचे निर्बंध असल्याने स्पर्धां ऐवजी ज्या अंध व्यक्ति रेल्वेमध्ये अथवा स्टॉल चालवतात अशा व्यक्तींवर त्यांचे कुटुंब अवलंबून आहे त्यांची उपासमार होऊ नये म्हणून स्व. लुईस ब्रेल यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून अशा गरजू दृष्टिहीन व्यक्तींना रेशन वाटप करण्यात आले. जन्मतः किंवा काही अपघातामुळे दृष्टी गमावलेल्या बांधवांना मोठ्या अडचणींना सामाना करावा लागतो, या अडचणी कमी करण्यासाठी तसेच त्यांच्या वेदनेवर मदतीची फुंकर मारण्यासाठी द ब्लाइंड वेलफेअर ऑर्गनाईजेशनने पुढाकार घेत 120 अंध व्यक्तींना गृहपयोगी साहित्याचे वाटप करत त्यांना मदतीचा हात दिला.

ब्रेल लिपीचे जनक स्व. लुईस ब्रेल यांच्या पुण्यस्मरणा निमित्त संस्थेच्या वतीने 9 जानेवारी 2021 रोजी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या वतीने 120 गरजू अंध व्यक्तींना एक महिना पुरेल इतका किराणा मालाचे तसेच मान्यवरांच्या हस्ते जनार्दन इंगळे व मंगेश धिवरे या दोन अंध व्यक्तींना रोजगारासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले. पंचवटीतील आर. पी. विद्यालय येथे झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी केले. यावेळी लायन्स क्लब कॉर्पोरेट चे अध्यक्ष विनय बिरारी, समन्वयक राजीव व्यास, पंचवटी एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी देवेंद्र पटेल हे मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी श्री पटेल यांनी संस्था राबवत असलेल्या उपक्रमांची प्रशंसा केली, भविष्यात अंध खेळाडूंची खेळाडूवृत्ती जोपासवी याकरिता क्रीडा स्पर्धा आयोजित करण्या करिता मैदान व अन्य सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संस्थेचे मानद अध्यक्ष विजय घाटगे, दिनेश मुसळे, रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.






**<u>10. हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न :</u>** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रथसप्तमीचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम संस्थेच्या कार्यालयात 6 फेब्रुवारी 2022 रोजी आयोजित करण्यात आला. खरेतर डोळस महिलांना एकत्रित येण्याकरिता अनेक व्यासपीठ असतात. गल्लीत अथवा प्रभागातील अनेक मंडल अशा कार्यक्रमांचे आयोजन करतात मात्र अंध हा घटक त्यात उपेक्षित असतो. म्हणूनच यावेळी संस्थेच्या हितचिंतक रोटेरियन सौ. आशा वेणु गोपाल यांच्या पुढाकाराने 40 अंध महिलांना हळदी कुंकवा सोबत दोन वाट्या आणि एक पातिले वान म्हणून देण्यात आला. व याच कार्यक्रमात अंध महिलांना सबळ होण्याकरिता बचत गट निर्माण करण्या बाबत रोटेरियन श्री. खैरणार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेच्या मानद अध्यक्षा सौ. कल्पना पांडे, कोषाध्यक्ष विजया दबे व संस्थेच्या अन्य पदाधिकारी महिला उपस्थित होत्या.




**11. इलेक्ट्रिक काठीचे वितरण :** ज्या व्यक्तीच्या हातात पांढरी काठी असते अश्या व्यक्ति अंध आहेत हे समाजाने गृहीत धरावे. याबाबतीत पुष्कळशी जागृतीही झाली आहे. परंतु अंध व्यक्तींना स्वतः चालताना वाटेत काही अडथळा आल्यास तो त्यांना समजायला हवा त्याकरिता संस्थेच्या वतीने अलीकडेच एक इलेक्ट्रॉनिक उपकरण विकसित केले असून सदर उपकरण किमान दोन मीटर दूर असलेला अडथळा व्हायब्रेशन च्या द्वारे त्यांना सहजरीत्या कळतो. सदर उपकरणाची किंमत 3500 रुयए एवढी असून या उपकरणाची जागृती अंध व्यक्तींमध्ये व्हावी. संस्थेच्या वतीने इंडसएंड बँकेच्या उपक्रमा अंतर्गत रविवार दिनांक 29 मार्च 2022 रोजी नाशिक येथील के टी एच एम महाविद्यालयात 140 गरजू अंध व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक काठीचे वाटप करण्यात आले. व याच कार्यक्रमात स्टेट बँक ऑफ इंडिया च्या सहकार्याने इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांकरिता गृहशास्त्र, आरोग्यशास्त्र व शरीरशास्त्र या पुस्तकाचे प्रकाशन करून प्रातिनिधिक स्वरूपात वितरित करण्यात आले. यावेळी मंचावर बँक ऑफ महाराष्ट्राचे झोनल मॅनेजर श्री. अनिल भामरे, महापालिका उपायुक्त सौ. अर्चना तांबे, अलिक्झिर संस्थेचे आशुतोष सिंग मंचावर उपस्थित होते. यावेळी श्री. भामरे यांनी आपल्या मनोगतातून बोलताना ही इलेक्ट्रॉनिक काठी अंध व्यक्तींच्या जीवनात खऱ्या अर्थाने एक मार्गदर्शिका होईल असा विश्वास व्यक्त केला. व संस्था राबवत असलेल्या शिष्यवृत्ती योजणेकरिता दत्तक पालक योजने अंतर्गत एक विद्यार्थ्याचे पालकत्व स्वीकारून 25,000 रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. तर अलिक्झिर संस्थेचे समन्वयक आशुतोष सिंग यांनी या काठीचे प्रात्यक्षिके दाखवून अंध बांधवांना दाखवून या काठीचा प्रसार अधिक व्यापक प्रमाणात होण्याकरिता संस्थेने पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त केली. तर सौ. अर्चना तांबे यांनी देखील संस्थेच्या उपक्रमांची प्रशंसा करून महापालिकेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अध्यक्ष अरुण भारस्कर, उपाध्यक्ष डॉ. विश्वासराव गायकवाड, सौ. मेघा पिंपळे व अन्य पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



एकंदरीतच या वर्षभरात जे ही उपक्रम राबविले ते अंध बांधवांसाठी अतिशय महत्वाचे व गरजेचे होते. कारण कोविड काळात आणि त्या नंतरच्या काळातही त्याचे पडसाद जनतेवर उमटलेले आहे. खरे तर हा काळ सर्वांची परीक्षा घेणारा होता. त्यात अंध व्यक्तींच्या अडचणी तर सहनुभवतून मी समजून घेतल्या आणि म्हणूनच आपण जी दूरदृष्टि दाखविली ती नीच्चितच कौतुकास्पद आहे. किंबहुना ते आपण दिलेल्या योगदानामुळेच शक्य झाले. व म्हणूनच खडतर रस्ता देखील मी सहजपणे पार केला व रस्ता आपल्या सहकार्यानेच सुखर झाला. त्यामुळेच संस्थेला आपले ध्येय गाठता आले. इथे काही संस्था व व्यक्तींचा नामनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो जसे की, कोटक महेंद्रा, सियाराम ग्रुप, भारत पेट्रोलियम विविध कार्पोरेट बँका तसेच रोटरी क्लब, लायन्स क्लब यांसारख्या सेवाभावी संस्था यांचे तर योगदान मिळालेच आहे. परंतु अहमदनगरचे नरेंद्र फिरोदिया, उल्हास देबडवार, केशव वरखेडकर, कृष्णकुमार गोयल, दलूचंदभाई जैन अशा काही व्यक्ती संस्थेचा आधार स्तंभ आहे कि, ज्यांचे योगदान अगदी संस्थेच्या सुरुवाती पासुनच आम्हाला मिळाले आहे. तसेच प्रसारमाध्यमांनीही संस्थेच्या कार्याची दखल घेतल्याने संस्था अनेकांपर्यंत पोहोचु शकली. या अहवालात कोणाचा उल्लेख करायचा राहिला असेल अशा ज्ञात अज्ञातांचे पुनश्च एकदा आभार.

भविष्यात संस्थेला एक मदत पुनर्वसन केंद्र सुरू करण्याचा मानस असुन उशीरा अंधत्व आलेल्या दृष्टीबाधित व्यक्तींना त्याचा फायदा होईल. आणि मला खात्री आहे कि, आपल्या सारख्या हितचिंतकामुळे मी बघितलेले स्वप्न हे स्वप्न न राहता त्याची कृती होईल.

याशिवाय मला सहकार्य करणारे संस्थेचे पदाधिकारी या सर्वांची साथ आहे म्हणूनच मी समर्थपणे इथपर्यंत वाटचाल करू शकलो त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांचे देखील मन:पूर्वक आभार.

आभाराचे शब्द कशाला !

उगा फूलांचे हार कशाला !

हृदयात असू दया स्थान आम्हाला !

अश्या घराला दार कशाला !

अश्या घराला दार कशाला !

महासचिव

दत्तात्रय शंकर पाटील